जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 SEP 2025
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. ग. गो. जाधव अध्यासनामध्ये आयोजित आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव. समवेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, दै. 'पुढारी'चे समूह सरव्यवस्थापक अनिल पाटील, डॉ. जी. एस. कुलकर्णी, अतुल शिरोडकर, डॉ. शिवाजी जाधव आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन देशातील परिपूर्ण माध्यम संकुल बनावे

## डॉ. प्रतापसिंह जाधव; कुलगुरूंच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील डॉ. ग. गो. जाधव अध्यासन देशातील परिपूर्ण अत्याधुनिक माध्यम संकुल बनावे, अशी अपेक्षा दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी व्यक्त केली.

विद्यापीठातील डॉ. ग. गो. जाधव अध्यासनामध्ये गुरुवारी दुपारी आढावा बैठक झाली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, दै. 'पुढारी'चे समूह सरव्यवस्थापक अनिल पाटील यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्यापीठ इंजिनिअरिंग विभागाचे अधिकारी प्रमुख उपस्थित होते. डॉ. जाधव यांनी डॉ. ग. गो. जाधव अध्यासन कामाचा आढावा घेताना अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

विद्यापीठाच्या वतीने सध्या मास कम्युनिकेशन, बीए. फिल्म मेकिंग, पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम, सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंट्री फोटोग्राफी, सर्टिफिकेट कोर्स इन शॉर्ट फिल्म मेकिंग हे कोर्स सुरू आहेत. येणारा काळ हा प्रिंट, डिजिटल व चॅनलचा असणार आहे. त्याअनुषंगाने अध्यासनामार्फत टी.व्ही. अँकरिंग व रेडिओ जॉकी यासह विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे पत्रकारितेचे नवीन अद्ययावत कोर्सेस सुरू करावेत. कर्मचारी भरतीसंदर्भात प्रस्ताव उच्चशिक्षण विभागास देण्याचे नियोजन करावे. लवकरात लवकर अध्यासन इमारतीचे बांधकाम पूर्ण करावे, अशा सूचना त्यांनी केल्या.

विद्यापीठाचे निवृत्त उपकुलसचिव जी. एस. कुलकर्णी यांनी अध्यासन इमारत बांधकामाचा आढावा घेतला. डॉ. ग. गो. जाधव अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी आभार मानले.

यावेळी उपकुलसचिव रणजित यादव, आर्किटेक्चर अमर उपाध्ये, निवृत्त उद्यान अधीक्षक चंद्रकांत जितकर, विद्युत अभियंता अमित कांबळे, तांत्रिक सल्लागार अतुल शिरोडकर, कॉंट्रॅक्टर बापू लाड, ठेकेदार सुनील नागराळे आदी उपस्थित होते.

### डॉ. ग. गो. जाधव अध्यासन उभारणीत कुलगुरू डॉ. शिर्के यांचे मोलाचे योगदान

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा पदाचा कार्यभार ६ ऑक्टोबर रोजी पूर्ण होत आहे. डॉ. ग. गो. जाधव अध्यासन उभारणीत त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. त्यांनी प्रत्येक गोष्ट पूर्ण करण्यासाठी विशेष वेळ दिला आहे. त्याबद्दल दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी शिवाजी विद्यापीठ, डॉ. ग. गो. जाधव अध्यासन व 'पुढारी' माध्यम समूहाच्या वतीने आभार व्यक्त केले.

27 SEP 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बाळासाहेब देसाईंमुळेच शिवाजी विद्यापीठ कोल्हापुरात

## मंत्री शंभुराज देसाई; विद्यापीठात ‘विचारधन’ ग्रंथाचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. २६ : ‘लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या तळमळीमुळेच कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ होऊ शकले. विद्यापीठात त्यांच्या नावाने असलेल्या अध्यासनाला अधिक चांगले स्वरूप देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करू’, अशी ग्वाही पर्यटनमंत्री शंभुराज देसाई यांनी आज येथे दिली.

विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनातर्फे ‘विचारधन : लोकनेते बाळासाहेब देसाई यांची विधिमंडळातील भाषणे भाग - १’ या डॉ. विजय चोरमारे संकलित व संपादित ग्रंथाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. पालकमंत्री प्रकाश आबिटकर प्रमुख उपस्थित, तर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी ‘विचारधन: लोकनेते बाळासाहेब देसाई यांची विधिमंडळातील भाषणे भाग-एक’ या ग्रंथाचे प्रकाशन करताना पर्यटन मंत्री शंभुराज देसाई आणि पालकमंत्री प्रकाश आबिटकर. यावेळी डावीकडून डॉ. अवनीश पाटील, डॉ. विजय चोरमारे, अशोकराव पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

मंत्री देसाई म्हणाले, ‘छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज आणि कोल्हापूर या तीन बाबी लोकनेते देसाई यांच्या हृदयाच्या जवळच्या होत्या. त्यामुळे त्यांनी राज्यभरात ठिकठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे उभारले. अखेरपर्यंत ते कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राहिले. गोरगरिबांची मुले आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यांचे विचार आणि वारसा यांची जाणीव ठेवून वाटचाल करण्याचा आमचा प्रयत्न आहे.’

पालकमंत्री आबिटकर म्हणाले, ‘विद्यापीठाने विविध महान व्यक्तिमत्त्वांच्या नावे अध्यासने उभारून त्यांच्या विचार, कार्याचा अभ्यास व संशोधन करण्याचा उपक्रम महत्त्वाचा आहे. लोकनेते देसाई यांच्यासारखे निःस्वार्थ, सामाजिक भावनेतून कार्य करणारे आदर्श आपल्याला मार्गदर्शक ठरतात.’

मंत्री देसाई आणि आबिटकर यांच्या हस्ते ग्रंथ प्रकाशन करण्यात आले. डॉ. चोरमारे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. अजितसिंह जाधव, सुहासिनी पाटील, महादेव देशमुख, अरुण भोसले, भारती पाटील, नंदकुमार मोरे, विश्वनाथ पानस्कर, अशोकराव पाटील, जयराज देसाई, राजेंद्र देसाई, पृथ्वीराज देसाई, यशराज देसाई उपस्थित होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

### कोल्हापूरबाबतची कृतज्ञता...

■ कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ‘लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी कोल्हापुरात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण पूर्ण केले. ही कृतज्ञता त्यांच्या मनी सदैव असावी, त्यामुळेच कदाचित ते विद्यापीठ येथे होण्याविषयी आग्रही राहिले असावेत.’

2 7 SEP 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठासाठी बाळासाहेब देसाईंचे मोलाचे सहकार्य

## मंत्री शंभुराज देसाई यांचे प्रतिपादन : कार्यक्रमास पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांची उपस्थिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापुरात होण्यासाठी तळमळीने काम केले. त्यांच्या सहकार्यामुळेच कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठ होऊ शकले, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे पर्यटन मंत्री शंभुराज देसाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनातर्फे 'विचारधन: लोकनेते बाळासाहेब देसाई यांची विधीमंडळातील भाषणे भाग-१" ग्रंथाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती



होती. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते.


मंत्री देसाई म्हणाले, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे असावे की सातारा येथे, याविषयी दुविधा त्यावेळी होती. या विषयाचा बैठकीसाठी मंत्रिमंडळात पोहोचले व स्वत: साताऱ्याचे असूनही कोल्हापूर येथेच विद्यापीठ होण्यासाठी आग्रह लावून धरला. गेटवे ऑफ इंडियापासून ते राज्यभरात ठिकठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे त्यांनी उभारले. अखेरपर्यंत कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राहिले. त्यांचे विचार आणि वारसा यांची जाणीव ठेवून वाटचाल करण्याचा प्रयत्न आहे. विद्यापीठातील देसाई अध्यासनाला सर्वोतोपरी सहकार्य करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

मंत्री आबिटकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा महान व्यक्तिमत्त्वांच्या नावे अध्यासने उभारून त्यांचे विचार व कार्याचा अभ्यास, संशोधन करण्याचा उपक्रम महत्त्वाचा आहे. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी कोल्हापुरात प्रतिकूल स्थितीतून शिक्षण पूर्ण केले. ही कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापुरात होण्यासाठी आग्रही भूमिका घेतली असावी.

मंत्री शंभुराज देसाई आणि मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते यावेळी ग्रंथ प्रकाशन करण्यात आले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. प्रमोद पाटील, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. महादेव देशमुख, डॉ. अरुण भोसले, डॉ. भारती पाटील, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. विश्वनाथ पानस्कर, अशोकराव पाटील, जयराज देसाई, राजेंद्र देसाई, पृथ्वीराज देसाई, यशराज देसाई आदी उपस्थित होते.

# लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्यामुळेच शिवाजी विद्यापीठ कोल्हापुरात : मंत्री शंभुराज देसाई

## विचारधन ग्रंथाचे शिवाजी विद्यापीठात प्रकाशन



कोल्हापूर दि . २६ : लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या तळमळीमुळेच कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ होऊ शकले, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे पर्यटन तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनातर्फे विचारधन: लोकनेते बाळासाहेब देसाई यांची विधीमंडळातील भाषणे भाग-१ या डॉ. विजय चोरमारे संकलित व संपादित ग्रंथाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. यावेळी व्यासपिठावर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के , प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आदी उपस्थित होते.

मंत्री देसाई म्हणाले, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे की सातारा येथे असावे याविषयी दुविधा त्यावेळी होती. मंत्रीमंडळासमोर याविषयीचा प्रस्ताव येणार असल्याचे समजताच प्रकृतीअस्वास्थ्य असतानाही बाळासाहेब देसाई हे त्या बैठकीसाठी पोहोचले आणि त्यांनी स्वतः साताऱ्याचे असतानाही कोल्हापूर येथेच विद्यापीठ होण्यासाठी आग्रह लावून धरला. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज आणि कोल्हापूर या तीन बाबी त्यांच्या श्रध्दास्थानी होत्या. गोरगरीबांच्या मुलांच्या कल्याणाच्या तसेच शेतकरी हितासाठी त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यांचे विचार आणि वारसा यांची जाणीव ठेवून वाटचाल करण्याचा आमचा प्रयत्न असून विद्यापीठातील देसाई अध्यासनाला अधिक चांगले स्वरुप देण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करू, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

तर मंत्री आबिटकर म्हणाले, आजच्या कालखंडात समाजापेक्षा व्यक्तीगत स्वार्थ मोठा होत आहे. या पार्श्वभूमीवर बाळासाहेब देसाईसारखे निस्वार्थ सामाजिक भावनेतून कार्य करणारे आदर्श आपल्याला मार्गदर्शक ठरतात. माझे चुलते खटाव येथे होते, ते बाळासाहेब देसाई यांचे कार्यकर्ते होते. त्यांच्या आठवणी ते आम्हाला सांगायचे. आज मी त्यांच्या नातवासमवेत काम करतो आहे, याचा मला मनस्वीः आनंद आहे, असेही ते म्हणाले.


जेष्ठ पत्रकार डॉ. विजय चोरमारे म्हणाले, लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्यासारख्या नेतृत्वाच्या विचारांचे दस्तावेजीकरण या निमित्ताने संकलित करता आले .त्यांचे कार्य मोठे आहे. देसाई यांच्या शैक्षणिक धोरणामुळे महाराष्ट्राची पहिली पिढी शिक्षणाच्या प्रवाहात येऊ शकली. प्रशासनात त्यांचा मोठा दरारा होता. अत्यंत अभ्यासू, संयमी आणि प्रगल्भ व्यक्तीमत्त्वाच्या देसाई यांनी आपल्या विरोधकांचाही सदैव आदरच राखला. त्यांचे कार्य आजच्या पिढीसाठी आदर्शवत स्वरुपाचे आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी कोल्हापुरात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण पूर्ण केले. या कृतज्ञतेपोटीच त्यांनी कदाचित शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे होण्याविषयी ठाम राहिले .

प्रारंभी लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. मंत्री शंभुराज देसाई व प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते संयुक्तरित्या ग्रंथ प्रकाशन करण्यात आले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, मानव्यविज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, सल्लागार समितीचे सदस्य डॉ. अरुण भोसले, डॉ. भारती पाटील, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. विश्वनाथ पानस्कर, अशोकराव पाटील, जयराज देसाई, राजेंद्र देसाई, पृथ्वीराज देसाई, यशराज देसाई यांच्यासह देसाई कुटुंबातील सदस्य, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सर्व सदस्य, विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्यामुळेच शिवाजी विद्यापीठ कोल्हापुरात : मंत्री शंभुराज देसाई

## 'विचारधन' ग्रंथाचे शिवाजी विद्यापीठात प्रकाशन




**कोल्हापूर (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज):**

लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या तळमळीमुळेच कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ होऊ शकले, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे पर्यटन मंत्री शंभुराज देसाई यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनातर्फे 'विचारधन: लोकनेते बाळासाहेब देसाई यांची विधीमंडळातील भाषणे भाग-१' या डॉ. विजय चोरमारे संकलित व संपादित ग्रंथाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.

मंत्री देसाई म्हणाले, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे असावे की सातारा येथे, याविषयी दुविधा त्यावेळी होती. मंत्रीमंडळासमोर याविषयीचा प्रस्ताव येणार असल्याचे समजताच प्रकृतीअस्वास्थ्य असतानाही बाळासाहेब देसाई त्या बैठकीसाठी पोहोचले आणि स्वतः साताऱ्याचे असूनही कोल्हापूर येथेच विद्यापीठ होण्यासाठी आग्रह लावून धरला. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज आणि कोल्हापूर या तीन बाबी त्यांच्या हृदयाच्या जवळच्या होत्या. त्यामुळे गेटवे ऑफ इंडियापासून ते राज्यभरात ठिकठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे त्यांनी उभारले. तसेच अखेरपर्यंत कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राहिले. गोरगरीबांच्या मुलांच्या कल्याणाचा विचार करून त्यांच्या हितासाठी, शेतकरी हितासाठी त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यांचे विचार आणि वारसा यांची जाणीव ठेवून वाटचाल करण्याचा आमचा प्रयत्न आहे. विद्यापीठातील देसाई अध्यासनाला अधिक चांगले स्वरुप देण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी मंत्री आबिटकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने विविध महान व्यक्तीमत्त्वांच्या नावे अध्यासने उभारून त्यांच्या विचार व कार्याचा अभ्यास व संशोधन करण्याचा उपक्रम महत्त्वाचा आहे. आजच्या कालखंडात समाजापेक्षा व्यक्तीगत स्वार्थ मोठा होत आहे. या पार्श्वभूमीवर बाळासाहेब देसाईंसारखे निस्वार्थ सामाजिक भावनेतून कार्य करणारे आदर्श आपल्याला मार्गदर्शक ठरतात. मंत्री शंभुराज देसाई हे बाळासाहेबांचे आदर्श नातू म्हणून त्यांच्या कार्याचा वारसा पुढे घेऊन जात आहेत, याचा अभिमान वाटतो. माझे चुलते खटाव येथे होते, ते बाळासाहेब देसाई यांचे कार्यकर्ते होते. त्यांच्या आठवणी ते आम्हाला सांगायचे. आज मी त्यांच्या नातवासमवेत काम करतो आहे, याचा आनंद आहे, असेही ते म्हणाले.एक महत्त्वाची कार्यपूर्ती साध्य केल्याचा हा आनंदाचा क्षण असल्याचे सांगून संपादकीय मनोगतामध्ये डॉ. विजय चोरमारे म्हणाले, लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्यासारख्या नेतृत्वाच्या विचारांचे दस्तावेजीकरण या निमित्ताने संकलित करता आले. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, लोकनेते बाळासाहेब देसाई आणि शरद पवार या चार नेत्यांप्रती महाराष्ट्राने सदैव कृतज्ञ राहायला हवे, इतके त्यांचे ऋण आहेत. देसाई यांच्या शैक्षणिक धोरणामुळे महाराष्ट्राची पहिली पिढी शिक्षणाच्या प्रवाहात येऊ शकली. प्रशासनात त्यांचा मोठा दरारा होता. अत्यंत अभ्यासू, संयमी आणि प्रगल्भ व्यक्तीमत्त्वाच्या देसाई यांनी आपल्या विरोधकांचाही सदैव आदरच राखला. त्यांचे कार्य आजच्या पिढीसाठी आदर्शवत स्वरुपाचे आहे.


अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी कोल्हापुरात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण पूर्ण केले. ही कृतज्ञता त्यांच्या मनी सदैव असावी, त्यामुळेच कदाचित ते शिवाजी विद्यापीठ येथे होण्याविषयी आग्रही राहिले असावेत. डॉ. विजय चोरमारे यांनी देसाई यांच्या भाषणांचे संकलन करून मोठे काम केले आहे. तथापि, त्यांच्या कार्याचे बरेचसे संकलन अद्यापही बाकी आहे. त्यामुळे पुढील भागांच्या कामालाही त्यांनी सुरवात करावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. मंत्री शंभुराज देसाई यांच्या हस्ते यावेळी ग्रंथ प्रकाशन करण्यात आले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, मानव्यविज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, सल्लागार समितीचे सदस्य डॉ. अरुण भोसले, डॉ. भारती पाटील, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. विश्वनाथ पानस्कर, अशोकराव पाटील, जयराज देसाई, राजेंद्र देसाई, पृथ्वीराज देसाई, यशराज देसाई यांच्यासह देसाई कुटुंबातील सदस्य, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सर्व सदस्य, विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 SEP 2025
सकाळ

# जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत विद्यापीठाचे वीस संशोधक

## अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाची क्रमवारी जाहीर



प्र-कुलगुरू
डॉ. पी. एस. पाटील

कोल्हापूर, ता. २६ : जगभरातील आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची सन २०२५ साठीची यादी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने नुकतीच जाहीर केली आहे. त्यात शिवाजी विद्यापीठाच्या वीस संशोधकांनी स्थान मिळविले आहे. सार्वकालिक कामगिरीच्या आधारेही संशोधकांची एक यादी तयार करण्यात आली असून, त्यामध्ये प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह डॉ. ए. व्ही. राव, डॉ. केशव राजपुरे, डॉ. ज्योती जाधव आणि डॉ. सी. एच. भोसले या पाच संशोधकांचा समावेश आहे.

स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रा. ए. व्ही. राव, प्रा. सी. एच. भोसले, डॉ. केशव राजपुरे, डॉ. विठोबा पाटील, डॉ. अण्णासाहेब मोहोळकर, डॉ. संजय लड्डे, डॉ. शरदराव व्हनाळकर, डॉ. तेजस्विनी भट, डॉ. मानसिंग टाकळे (पदार्थविज्ञान), डॉ. संजय गोविंदवार, डॉ. ज्योती जाधव (जैवरसायनशास्त्र), डॉ. सागर डेळेकर, डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. हेमराज यादव, डॉ. अनिल घुले (रसायनशास्त्र), डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. सुशीलकुमार जाधव (नॅनोसायन्स), डॉ. के. के. पवार, सचिन ओतारी (जैवतंत्रज्ञान) यांचा समावेश आहे.

### रँकिंग प्रक्रिया अशी...

- संशोधनाची गुणवत्ता निर्धारित करण्यासाठी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने शोधनिबंधाला मिळणारी सायटेशन्स, एच निर्देशांक, सहलेखकत्व, संशोधन लेखकाची नेमकी भूमिका या घटकांचा सारासार विचार करून सर्वसमावेशक आणि सर्वमान्य अशी संयुक्त सूचक (सी स्कोर) निर्देशांक काढून ही जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांची क्रमवारी प्रसिद्ध केली जाते. ही प्रणाली 'आयसीएसआर' लॅबद्वारे 'एल्सव्हियर'ने प्रदान केलेल्या स्कोपस डेटाचा वापर करते.

> 'गेली सहा वर्षे सातत्याने शिवाजी विद्यापीठाचे संशोधकीय महत्त्व जगाच्या नकाशावर हे संशोधक अधोरेखित करीत आहेत, ही अत्यंत अभिमानाची व आनंदाची बाब आहे.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 7 SEP 2025
पुढारी

# डॉ. मंजिरी मोरे-देसाई : शिक्षण क्षेत्रातील कर्तृत्ववान 'आधुनिक सावित्री'






कोल्हापूरच्या प्रतिष्ठित शिक्षण प्रसारक मंडळाच्या चेअरमनपदी डॉ. मंजिरी देसाई यांची नुकतीच निवड झाली. शिक्षण क्षेत्रातील आपल्या अद्वितीय कार्यकर्तृत्वाने आणि दूरदृष्टीमुळे डॉ. मंजिरी मोरे-देसाई यांनी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वाटचालीस एक नवा आयाम दिला आहे. संस्थेच्या चेअरमनपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी उत्कृष्ट शैक्षणिक आणि प्रशासकीय कामगिरी करत संस्थेला यशाच्या नव्या शिखरावर नेले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट आणि विद्या परिषद सदस्य म्हणून त्या कार्यरत आहेतच. शिवाय अलीकडेच त्यांची विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर बिनविरोध निवड झाली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात महत्त्वाची तीन पदे भूषविणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत, जो संस्थेसाठी अत्यंत अभिमानास्पद क्षण आहे.

**दूरदृष्टी : गुणवत्तापूर्ण विकास**

डॉ. मोरे-देसाई यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण प्रसारक मंडळाने गुणवत्तापूर्ण निकालांचे सातत्य राखले आहे. संस्थेच्या महाविद्यालयाने राष्ट्रीय मूल्यांकन परिषदेच्या (NAAC) तिसऱ्या चक्रात CGPA ३.२३ सह 'ए' ग्रेड मिळवून आपला शैक्षणिक दर्जा सिद्ध केला. याशिवाय नुकताच संस्थेच्या बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालय सावंतवाडीला मिळालेला मुंबई विद्यापीठाचा सर्वोत्तम ग्रामीण महाविद्यालय पुरस्कार हा त्यांच्या नेतृत्वाखालील टीमच्या मेहनतीचा तेजस्वी मुकुट आहे.

चेअरमन म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी शिक्षण, उद्योग आणि व्यवसाय क्षेत्राची गरज ओळखून विविध नवे आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम सुरू केले. पारंपरिक अभ्यासक्रमांसोबतच कॉम्प्युटर सायन्स, जिओलॉजी, न्यूट्रिशियन-डायटेटिक्स, कॅटरिंग, ग्रामीण पत्रकारिता अशा अल्प मुदतीच्या आणि कौशल्य आधारित अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला. संशोधन, कौशल्य विकास आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी 'इनक्युबेशन हब'. तयार करण्याची त्यांची योजना संस्थेला भविष्यासाठी सज्ज करत आहे.

## बहुमानांकित नेतृत्व

डॉ. मंजिरी मोरे-देसाई यांचे कर्तृत्व राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मानित झाले आहे. त्यांना इंडियन वूमेन सायंटिस्ट असोसिएशनच्या अध्यक्ष, अमेरिकेचा ग्रीन कॉलेज ॲवॉर्ड, दुबई येथील रेडिओ सिटीचा एक्सलन्स इन हायर एज्युकेशन आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र संचलित करिअर कट्टा उपक्रमांतर्गत 'आधुनिक सावित्री-२०२५' अशा अनेक पुरस्कारांनी गौरविले आहे.

## संस्थेचा विस्तार

संस्थेची गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय कोल्हापूर, बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालय वेंगुर्ला, सुशिलादेवी देसाई कन्या महाविद्यालय पेठवडगाव ही महाविद्यालये नॅक रँकिंग आणि पेठवडगाव, कागल, मुरगुड, सेनापती कापशी, वेंगुर्ला, कोल्हापूरातील हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, इग्लिश मिडियम स्कूल आहे.

**महिला सबलीकरणाचा वारसा**

डॉ. मोरे-देसाई यांनी शिक्षणमहर्षी डॉ. एम. आर. देसाई यांचा शैक्षणिक, माजी आमदार दिलीप देसाई यांचा राजकीय आणि श्री दत्ताबाळ यांचा आध्यात्मिक वारसा समर्थपणे जपला आहे. त्यांचे नेतृत्व स्त्री सबलीकरणाचे उत्तम उदाहरण आहे. महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या मुलांच्या अगदी बरोबरीने आली आहे. शिक्षण प्रसारक मंडळ एका विद्यार्थ्यापासून सुरू होऊन आज सुमारे तीस हजार विद्यार्थ्यांना घडवत आहे. डॉ. मंजिरी मोरे-देसाई यांच्या दूरदृष्टीपूर्ण आणि गतिमान नेतृत्वाखाली ही संस्था नवतंत्रज्ञान आणि बदलांना आत्मसात करत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याची जबाबदारी निरंतरपणे सांभाळत राहील, यात शंका नाही.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 7 SEP 2025
तरुण भारत

# विद्यापीठात पं. दीनदयाल उपाध्याय यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज पंडित दीनदयाल उपाध्याय यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते पं. उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, व्यावस्थापन परिषद सदस्य स्वागत परुळेकर, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. पवन गायकवाड, डॉ. एस.टी. कोंबडे, आनंद खामकर, डॉ. प्रमोद पांडव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 SEP 2025
तरुण भारत



इचलकरंजी: डिकेएएससीच्या खेळाडूंची शिवाजी विद्यापीठ योगासन संघात निवड झाल्याबद्दल सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे.

# डिकेएएससीच्या खेळाडूंची शिवाजी विद्यापीठ योगासन संघात निवड

**इचलकरंजी :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डीकेएएससी कॉलेज, इचलकरंजीच्या खेळाडूंची चेन्नई येथे होणाऱ्या वेस्ट झोन इन्टर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय योगासन स्पर्धेत सन्मती सगरे व ऐश्वर्या पाटील यांनी ट्रॅडीशनल टिम या प्रकारात पाचवा आणि सहावा क्रमांक पटकावला तर सौरभ पाटील याने ट्रॅडीशनल वैयक्तिक प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून शिवाजी विद्यापीठ संघात स्थान निश्चित केले व चेन्नई येथे होणाऱ्या वेस्ट झोन इन्टर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात त्यांची निवड झाली. खेळाडूंना प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांचे प्रोत्साहन लाभले. महाविद्यालयाचे प्रबंधक आर. बी. जोग, वरिष्ठ लिपीक सुनिल अपराध यांनी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 SEP 2025

पुढारी

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास : डॉ. टी. एम. चौगुले

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा व नेतृत्व गुण विकास करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वाची आहे. या योजनेच्या माध्यमातून विद्यार्थी समाजप्रिय होऊ शकतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगुले यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयात आयोजित एन.एस.एस.च्या वर्धापन दिन व नशामुक्त अभियान कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. पी. आर. बागडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. हेमंत पाटील यांनी आभार मानले. साक्षी क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. पाहुण्यांची ओळख डॉ. बी. टी. दांगट यांनी केली. नशामुक्त अभियानाची शपथ प्रा. ए. बी. वसेकर यांनी विद्यार्थ्यांना दिली. यावेळी डॉ. संदीप पाटील, डॉ. राजश्री पाटील, प्राध्यापक व स्वयंसेवक उपस्थित होते.